चित्र कथा

क्र.३३

# हर्ष

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. १५८६५

दा. १५८६५
वि. बा. वा



IRBK-0115865

सुमारे १४०० वर्षां
प्रदेशावर प्रभाव
णांनी ठाणेश्वराव
माचार घेण्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिन

...त राजा म्हणून ...ती. हर्ष रणांगणावर शूर म्हणून तर प्रसिध्द होताच; पण त्याहीपेक्षा एक प्रजापालनदक्ष राजा म्हणून त्याची ख्याती होती. तो उदार मनाचा होता आणि कलावंतांना व पंडितांना त्याच्या दरबारात मोठा मान असे. बाणभट्ट, मयूर आणि दिवाकर यांसारखी विद्वरत्ने त्याच्या दरबारात झळकत होती.

ठाणेश्वराच्या इतिहासातल्या एका नाजुक क्षणी हर्षवर्धन सिंहासनावर आरूढ झाला. त्याचे वडील नुकतेच मरण पावले होते आणि मोठ्या भावाचा एका प्रबळ शत्रूने खून केला होता. शेजारीच हर्षाच्या मेहुण्याचे कनौजचे राज्य होते आणि त्यालाही शत्रूने जिंकले होते. हर्षाने या सर्व संकटांना यशस्वीपणे तोंड तर दिलेच, पण ठाणेश्वर या छोट्या राज्याची प्रतिष्ठा एवढी वाढवली की उत्तर भारतातले प्रथम श्रेणीचे म्हणून ते प्रसिद्धी पावले.

राजश्रीची सुटका करीपर्यंतची हर्षाच्या जीवनाची तपशीलवार हकीकत बाणभट्टाच्या 'हर्षचरिता'त आलेली आहे. तत्कालीन भारताच्या आर्थिक व राजकीय परिस्थितीची आणखी माहिती ह्यूएन त्सांग या चिनी प्रवाशाने लिहून ठेवलेल्या वर्णनावरून कळते.

हर्ष बहुगुणी राजा होता. त्याने काव्यही रचलेले आहे; इतकेच नाही तर तत्कालीन कवींमध्ये भवभूतीच्या खालोखाल हर्षाचा क्रम लागतो. 'रत्नावली' 'प्रियदर्शिका' व 'नागानन्द' ही तीन नाटके त्याने लिहिली असे म्हणतात

Printed by H. K. Nasta at IBH Printers, Marol Naka, Mathuradas Vissanji Road, A
Bombay 59. Published by H. G. Mirchandani, trustee, IBH Education Trust, 12 H
Dalamal Park, 223 Cuffe Parade, Bombay-5.

Editor: Anant Pai
Illustrated by Madhu Powle

Written by: Yagya Sharma Anand Pra
Translation: B.


घनघोर युध्दानंतर हूणांनी माघार घेतली.
राज्यवर्धनाचा विजय असो! हर्षवर्धनाचा विजय असो!
थांबा! अंधार पडला. त्यांचा पाठलाग करणं थांबवू या आपण.
होय, दादा. आता इथेच तळ देऊ या.
हूणांनी पुन्हा हल्ला केला नाही.
हर्षा, हे ठीक झालं!
कित्येक दिवसांत लढायला मिळालं नाही. मी आपला शिकारीला जातो.


शिबिरापासून दूर शिकार करीत असता हर्षाला दिसले की, कुणीतरी स्वार आपल्या दिशेने येतो आहे.
बराच घाईत दिसतो!
राजकुमार हर्ष, आपले पिताजी फार आजारी आहेत. दोघाही कुमारांना भेटण्याची त्यांना उत्कंठा लागली आहे.
मी आत्ताच त्यांच्याकडे जातो! दादालाही सांगा.
दोघेही राजपुत्र घाईने ठाणेश्वरास परतले. पण उशीरच झाला.
तुमचे पिताजी फार थोर होते, कुमार.
मग काही दिवसांनी-
कुमार राज्यवर्धन, आपण आता सिंहासनावर बसावं.
नाही- हर्षाला राजा होऊ दे.



राजभगिनी राज्यश्री कनोजचा राजा ग्रहवर्मा याची पत्नी. आपल्याला वाटणारी चिंता तिने पतीजवळ बोलून दाखवली.



इकडे मालव देशाचा लोभी राजा देवगुप्त एका कारस्थानात गुंतला होता.
ही संधी बरी आहे- ठाणेश्वर नि कनौज दोन्ही राज्यं घशात घालावीत!
पण महाराज, ती बलवान राज्यं आहेत!
माहीत आहे. पण आपण ग्रहवर्म्याला ठार करू. मग राज्यवर्धनासारख्या पोराची काय बिशाद आहे दोन राज्यं संभाळण्याची!
पण--- ग्रहवर्म्याला कसं मारणार आपण?
मी एक डाव रचला आहे! वसंतोत्सवात साध्या शेतकऱ्यांचे वेष करून आपण कनौजच्या प्रजाजनांत मिसळू. ग्रहवर्मा आपल्या परिवारासह उत्सवाच्या जागी आला की त्याला ठार करू.




या कारस्थानानुसार देवगुप्त व त्याचे सैनिक साधे पोशाख करून कनोज-च्या जनतेत मिसळले. नंतर राजा ग्रहवर्मा मंदिरात शिरण्याच्या बेतात असता –





ग्रहवर्म्याच्या वधानंतर देवगुप्ताने राज्यश्रीला जबरदस्तीने पकडून नेले.
धावा-- धावा!
देवगुप्ताच्या अत्याचाराची वार्ता
कानावर गेली.
महाराज, मालव राजाने आपल्या भगिनीला पळवलं!
त्याला म्हणावं--मरणाला सज्ज हो!



महाराज, मला सांगा-- मी मालव राज्यावर हल्ला करतो.
नको- हर्षा!
मी मोठा भाऊ आहे- राजा आहे. माझंच ते काम आहे.
इकडे मालव देशात-
भेकडासारखे वागलात तुम्ही!
तू वाटेल ते म्हण. मी आता कनोजखेरीज ठाणेश्वराचाही राजा होईन.
हिला कैदेत टाका! राजाला मान देत नाही म्हणजे काय?


कारागृहातली दृश्ये पाहून राज्यश्रीला कसेसेच झाल.
दुसऱ्या कैद्यांच्या आर्त किंकाळ्यांनी ती भयभीत होई.
देवा-- देवा!
राज्यश्रीच्या मनाला यातना होत होत्या; पण देवगुप्त खुषीत होता.


इतक्यात देवगुप्ताला एक संदेश मिळाला.
राज्यवर्धन हल्ला करण्याच्या बेतात आहे.
मला वाटलंच असं होईल! जा आणि गौड देशाच्या शशांक राजाला भेटीला बोलाव!
देवगुप्ताची शशांकाशी गुप्त बोलणी सुरू झाली.
मला मदत द्याल तर ठाणेश्वर नि कनौजच्या राज्याचा निम्मा वाटा तुम्हाला देईन.
ठीक आहे. काय करू मी?
राज्यवर्धनाच्या गोटात शिरा. तो हल्ला करील तेव्हा तुमचंही सैन्य त्यात असू द्या!
लढाई सुरू झाली की राज्यवर्धनावर पिछाडीकडून हल्ला करा. तो मेला की विजय आपलाच आहे!
डाव सुंदर आहे. आपण नक्की जिंकणार!


शशांकाने तसे केले. कपटहेतू मनात धरून तो राज्यवर्धनाबरोबर मालव देशावर चालून गेला.
शशांक महाराज, तुमच्या मदतीबद्दल मी आभारी आहे. मित्रा, तुझ्यावर मी निरंतर विश्वास ठेवीन!
माझे खाजगीतले रक्षक युध्दात तुझं रक्षण करतील.


युध्दामुळे देवगुप्ताच्या तुरुंगात केवढी खळबळ उडाली.
सर्व सैनिक युध्दासाठी हवेत. कारागृहावर एकच रक्षक ठेवा!
तो एकुलता एक रक्षक थोर मनाचा होता.
या गुप्त वाटेने तुम्हाला अरण्यात जाता येईल.
धन्यवाद! तू फार उदार मनाचा आहेस. आता स्वतःच्या जिवाला जप!


अशा प्रकारे देवगुप्ताच्या तुरुंगातून राज्यश्री निसटली.
देवगुप्ताचे सैनिक अरण्यातही फिरत होते. पण सुदैवाने त्यांना राज्यश्री दिसली नाही.
शेवटी तिने अरण्य गाठले.


इकडे राज्यवर्धन शौर्याने लढला. शशांकाचे काही चालेना; कारण त्याच्या भोवती राज्यवर्धनाच्या रक्षकांचा वेढा होता!
अखेरीस राज्यवर्धनाने देवगुप्ताला ठार मारून विजय मिळवला.
राज्यवर्धन महाराजांचा विजय असो!
देवगुप्ताच्या मृत्यूमुळे शशांकाची गाळण उडाली.
देवगुप्त मेला अन् माझी स्वप्न धुळीला मिळाली!


पण काहीतरी करून या राज्यवर्धनाला मारता आलं तर त्याच्या राज्याचा कणाच मोडेल. मग मी ते बळकावू शकेन.
आता पुढचे बेत आखू या. महाराज रात्री माझ्या शिबिरात यावं.
अवश्य येईन.
त्या रात्री शशांकाच्या शिबिरात
आता मला याच क्षणी पळालं पाहिजे!


ठाणेश्वराच्या राजसभेत–
शशांक राजाने महाराजांचा कपटाने वध केला!
शशांका, याचा तुला जाब द्यावा लागेल!
आणि महाराज, महाराणी राज्यश्री कैदेतून निसटल्या. पण त्या कुठे गेल्या याचा कुणालाच पत्ता नाही!
महाराणींच्या शोधार्थ सर्व दिशांना हेर पाठवा.
शशांकाला शासन करण्यासाठी हर्ष प्रचंड सैन्यानिशी चालून गेला.


तरुण हर्ष सैन्य संघटित करील अशी शशांकाला कल्पनाच नव्हती.
महाराज, शशांक भेकडासारखा रानात पळाला आहे.
एक दिवस तो कुत्र्याच्या मरणाने मरेल! पण आधी मला माझ्या राज्यश्रीताईला शोधलं पाहिजे.
महाराज, राज्यश्रीदेवीची वार्ता घेऊन एक दूत आला आहे.
बोलवा त्याला आत!


महाराज राज्यश्रीदेवीं-सारखी दिसणारी एक स्त्री काही जणांनी पाहिली. पर्वताच्या दिशेला जात होती.
ताईच नसेल ना ती?- चला, आपण याचा तपास लावू या.


बाई अतिशय अस्वस्थ दिसत होती असंही ऐकलं.
हं.. सारं ठीक असलं म्हणजे झालं!



राज्यश्री खरोखरच अस्वस्थ होती.
मला कुणाचंही सहाय्य नाही.
मी जगून काय करू?
भाऊराया!
ताई!- थांब-थांब!
हो.पण मला नाही, तर दुसऱ्यांना असाच त्रास भोगावा लागणार राज्याराज्यातल्या किरकोळ भांडणां-पायी!
ताई, तुझे दुःखाचे दिवस आता संपले.
ताई, मी प्रतिज्ञा करतो की या दुःखाचं मूळच मी उखडून टाकीन!


आणि लवकरच हर्षाने उत्तर भारतातली सर्व छोटी राज्ये आपल्या अमलाखाली आणून शांतता प्रस्थापित केली.
सर्व राज्यं एका ध्वजाखाली आली. आता एकमेकांत लढाया करण्याचं कारण उरलं नाही. गरीब शेतकरी यापुढे सुखासमाधानाने नांदतील.
हर्ष शांततेचा भुकेला आहे हे पुलकेशीला माहीत नव्हते. दक्षिणेतल्या या महान राजाला हर्षाच्या वाढत्या सामर्थ्याची भीती वाटे.
पुलकेशी महाराज, हर्षाचं साम्राज्य काठेवाडला भिडलं! कोणत्याही क्षणी तो आपल्यावरही चालून येईल.
मग आपणच आधी चालून गेलो तर?


काठेवाड जिंकून हर्ष परत येत होता. त्याचे सैनिक थकले होते. त्यांना घराची ओढ लागली होती.


अशा वेळी पुलकेशीने अचानक हल्ला चढवला.


युध्द बरेच दिवस चालले. दोन्ही पक्षांची अतोनात हानी झाली.
हर्षाच्या थकलेल्या सैनिकांना माघार घेणे भाग पडले. हर्षाची घोर निराशा झाली.
एवढी माणसं मेली ? कशापायी ?
काही दिवसांनंतर ठाणेश्वरात–
महाराज,आपण पुलकेशीवर स्वारी करू या. आता त्याला आपण चिरडू शकू.
नाही!-झाला एवढा रक्तपात पुरे झाला!


यापुढे युध्द नको!
भविष्यकाळात मी माझी शक्ती दुर्बळांचं नि गरिबांचं रक्षण करण्यात वेचीन.
आपलं अंतःकरण थोर आहे, महाराज!
हर्ष महाराजांचा विजय असो!


आपले हे स्वप्न खरे व्हावे म्हणून हर्षाने गरिबांना दान दिले.
रुग्णांना मोफत औषधोपचार व्हावेत म्हणून वैद्यांची नेमणूक केली.
विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय केली.
त्याच्या राजवटीत चीनसारख्या दूरच्या देशातून भारतात व्यापारी येत.
लोकांची भरभराट झाली.
निरनिराळ्या धर्मांचे लोक आता शांततेने व प्रेमाने एकत्र राहात.


अशा त्या काळात ह्यूएन्त्संग हा सुविख्यात चिनी पंडित भारतात आला.
महाराज, एक बौध्द भिक्षू आपल्याला भेटू इच्छितो.
आणा त्यांना आत.
पंडितराज ह्यूएन्त्संग आपलं स्वागत असो! आपल्या भेटीची मी वाटच बघत होतो.
महाराज, माझा आपण बहुमान करता!
राजाधिराज, बौध्द धर्माचा विशेष अभ्यास करता यावा म्हणून मी आलो.
आपला इथला निवास सुखाचा होवो!
काही वर्षे ह्यूएन्त्संग भारतात राहिला.


ह्युएन्त्संगच्या उपस्थितीत हर्षाने एकदा एक सर्वधर्म परिषद भरवली.
अमात्य, विविध धर्मांच्या पंडितांना परिसंवादासाठी पाचारण करा!


वैदिक, जैन आणि बौध्द धर्मांचे अधिकारी विद्वान परिसंवादात भाग घेण्यासाठी आले.


रिषद पुष्कळ दिवस चालली होती.
ह्युएन्त्संगनेही वादविवादात भाग घेतला.
आचार्य ह्युएन्त्संग, आपल्या-सारखा पंडितश्रेष्ठ मी पाहिलेला नाही.
पण आपल्या राजाने एका परकीयाची एवढी स्तुती करावी हे काही शिष्यांना आवडले नाही.
या चिन्याने महाराजांवर एवढी छाप पाडली तर आपल्याला पारितोषिक मिळण्याची आशाच नको!
होना! तसं काही होण्यापूर्वीच या माणसाचा निकाल लावला पाहिजे!


पण या कारस्थानाची कुणकुण हर्षाला लागली.
या कपटी लोकांनी ध्यानात ठेवावं - आचार्य ह्यूएन-त्संगच्या केसालाही धक्का लावणाराला कडक शासन केलं जाईल! - जा - दौंडीच पिटा अशी!
माझा अहिंसेवर विश्वास आहे. गरिबांना नि दुर्बलांना मी अभय देईन पण अत्याचारांची शिकवण देणारांना प्राणदंडाची शिक्षा मिळेल!
हि गोळी लागू पडली. कोणीही ह्यूएनत्संगच्या वाटेला गेले नाही.
परिषद संपली आहे. आता विद्वज्जनांचा सत्कार होईल.
सर्व तयारी झालेली आहे, महाराज.



दुसऱ्या दिवसापासून विविध धर्मीय पंडितांना व पुरोहितांना उपहार देण्याचे कार्य
माझ्या या अल्पशा भेटीचा स्वीकार व्हावा.
राजाधिराज, परमेश्वर आपलं रक्षण करो!





आणि मग गरीब शेतकऱ्यांची पाळी आली.




IRBK-0115865


दानात अडथळा नको--- राज्यश्रीताई एखादे वस्त्र देतेस ?
देते, भाऊराया!
अशा प्रकारे दर पाच वर्षांनी हर्ष राजा आपली सर्व संपत्ती विद्वानांना, पुरोहितांना आणि गरिबांना दान देत असे.
हर्ष महाराज चिरायू होवोत!
हं – घ्या हे कपडे!
हर्ष महाराज चिरायू होवोत!

ह्युएनत्संग चीनला परत गेला. त्याने
... पासू ...
... र ज्या आठवणी नेल्या त्यांनी भारताच्या पुरातन संस्कृतीचा
नावलौकिक साऱ्या जगतात पसरला.



# सम्राट हर्ष




IRBK-0115865

सुमारे १४०० वर्षांपूर्वी उत्तर भारतातल्या ठाणेश्वर नावाच्या एका विशाल प्रदेशावर प्रभाकरवर्धन राजा राज्य करीत होता. त्याच्या कारकीर्दीत हूणांनी ठाणेश्वरावर हल्ले करून लोकांना सतावायला सुरवात केली. त्यांचा समाचार घेण्यासाठी राजाने आपल्या कर्तबगार मुलांना पाठवले.